# दि सीकेपी को-ऑप . बँक लि .

दि . 27 सप्टेंबर 2017 रोजी झालेल्या 101 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

दि सीकेपी को-ऑपरेटिव्ह बँकेची 101 वी वार्षिक सर्वसाधारण सभा दि . 27 सप्टेंबर 2017 रोजी किर्ते भंडारी हॉल, गोखले रोड (उत्तर), सेना भवन जवळ, दादर (पश्चिम), मुंबई -400028 येथे सकाळी 11 . 00 वाजता संपन्न झाली . सभेला 318 सभासद उपस्थित होते .

बँकेचे उपाध्यक्ष श्री . अनंत भोसले, संचालक श्री . भाऊसाहेब चौधरी, श्री . राजेंद्र फणसे, श्री . संदीप ताम्हणकर, श्री . प्रकाश शिंदे, श्री . प्रभाकर वैद्य, श्रीमती सावी मानकामे, श्रीमती मृणाल टोसर व बँकेचे सरव्यवस्थापक - श्री . मोरेश्वर धायमोडकर सभेस व्यासपिठावर उपस्थित होते . तसेच कर्मचारी प्रतिनिधी श्री . सोमनाथ माने व श्री . जितेंद्र भोसले सभेस उपस्थित होते .

अध्यक्ष - श्री . चिंतामणी भिंगे, संचालक - श्री . संदेश पवार, श्री . संजय ताम्हाणे, श्री . संतोष थोरात सभेस अनुपस्थित होते .

गणसंख्या पूर्ण न झाल्यामुळे सभा अर्धा तास उशीरा सुरू होईल असे जाहीर केले . त्याप्रमाणे सकाळी ठीक 11 . 30 वाजता उपाध्यक्ष श्री . अनंत भोसले यांनी सभेचे अध्यक्ष पद स्विकारून सभेला सुरूवात केली . कु . उषा राणे हिने सर्व उपस्थितांचे स्वागत करून सर्वांना आसन ग्रहण करण्याची विनंती केली . सभेचे कामकाज सुरू होण्यापूर्वी कु . उषा राणे हिने अहवाल वर्षात स्वर्गवासी झालेल्या सर्व ज्ञातअज्ञात सभासद, खातेदार आणि ठेवीदारांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त करून सर्वांना 2 मिनीटे शांतता पाळून आदरांजली वाहण्याची विनंती केली . सर्वांनी 2 मिनीटे शांतता पाळून दिवंगतांना श्रध्दांजली वाहिली .

कु . उषा राणे हिने सर्वप्रथम अध्यक्ष श्री . चिंतामणी भिंगे हे आजारी असल्यामुळे सभेस उपस्थित राहू शकले नाहीत असे सांगितले . तदनंतर कु . उषा राणे हिने व्यासपिठावर उपस्थित सर्व संचालकांची ओळख करून दिली .

त्यानंतर सौ . धनश्री भुस्कुटे हयांनी सभेचे सूचना वाचन सुरू करताच सभासद श्री . सबनीस यांनी संचालक मंडळात 13 संचालक असताना सभेस फक्त 8 संचालक का उपस्थित आहेत? अशी विचारणा केली . अध्यक्ष का गैरहजर आहेत? त्यांना सभेचे गांभीर्य नाही का? तसेच थकबाकीदार संचालक श्री . संजय ताम्हाणे, श्री . संतोष थोरात व श्री . संदेश पवार यांच्यावर काय कारवाई करण्यात आली अथवा कारवाई केली नसल्यास त्याची कारणे दया असे श्री . सबनीस यांनी विचारणा केली .

बँकेचे अध्यक्ष श्री . भिंगे हे आजच्या वार्षिक सर्वसाधारण सभेला हजर नाहीत . बँक आर्थिक अडचणीत असूनही गेले कित्येक महिने कार्यरत नाहीत अशी तक्रार सभासद श्री . मोहन मांगले यांनी केली व संचालक श्री . संजय ताम्हाणे, श्री . संतोष थोरात व श्री . संदेश पवार यांच्या अनुपस्थितीत बद्दल विचारणा केली .

थकबाकीदार संचालक श्री . संजय ताम्हाणे, श्री . संतोष थोरात व श्री . संदेश पवार यांना कर्जाचा भरणा करावयास सांगितले आहे का? तसेच त्यांच्यावर काय कारवाई करण्यात आली? हया सर्व प्रश्नांची उत्तरे देण्याची विनंती सभासद श्री . देशपांडे यांनी केली .

बँक आर्थिक अडचणीत असल्यामुळे आणि अनुत्पादीत कर्जाची वसुली होत नसल्यामुळे सीकेपी बँक ग्राहक बचाव समितीने उपाध्यक्षांकडे चर्चेसाठी मिटींगही मागीतली होती . उपाध्यक्षांनी त्याची टाळाटाळ करून चर्चेसाठी मिटींगही नाकारली . श्री . हर्षल प्रधान हे अनुत्पादीत कर्जाच्या वसुलीसाठी सर्वतोपरी सहकार्य करीत असताना संचालक मंडळातील मतभेदामुळे त्यांच्याकडे पुन्हा मिटींगही होऊ शकली नाही . श्री . मनिष चित्रे हे तज्ञ संचालक पदी काम करण्यास तयार असताना त्यांची तज्ञ संचालक पदी नेमणूक करण्यात आली नाही अशी अशी तक्रार सभासद श्री . प्रफुल्लचंद्र दिघे यांनी केली . त्यापुढे त्यांनी रिझर्व्ह बँकेकडून आलेल्या कारणे दाखवा नोटीसचा उल्लेख ही आपल्या तक्रारीमध्ये केला .

बँक अडचणीच्या काळातून जात असताना सर्व संचालकांनी परस्परातील हेवेदावे दूर ठेवून एकत्र येऊन काम करावे अशी विनंती सभासद श्री . शिलोत्री यांनी संचालकांना केली .

सभेला सुरूवात करण्यापूर्वी थकबाकीदार संचालकांवर कारवाई करून कर्जाची पूर्ण रक्कम त्यांच्याकडून वसूल करण्यात यावी असा ठराव करण्यात यावा आणि अश्या थकबाकीदार संचालकांमुळे आमच्या ठेवी आम्हाला परत मिळत नाहीत अशी तक्रार श्री . चंदनानी धामणकर यांनी केली . अश्या प्रकारे अनेक सभासदांनी एकाच वेळी तक्रार केली . त्यामुळे सभेमध्ये गदारोळ व गोंधळ निर्माण झाला . त्यावेळी संचालक श्री . भाऊसाहेब चौधरी, श्री . प्रकाश शिंदे व श्री . राजेंद्र फणसे यांनी सर्व सभासदांना शांत रहण्याची विनंती केली .

सभा सुरू करावयाची असल्यास सर्व सभासदांच्या प्रश्नांची उत्तरे सभागृहात उपस्थित संचालकांकडून देण्यात येतील असे आश्वासन संचालकांकडून घेण्यात यावे असे श्री. शिलोत्री यांनी सभेला सुचविले.

सतत गैरहजर रहणारे अध्यक्ष आणि थकबाकीदार संचालक यांच्यावर अविश्वास दाखवत सध्याचे कार्यरत संचालक मंडळ बरखास्त करण्याची श्री. सी. जी. गुप्ते यांनी मागणी केली.

त्यानंतर श्री. सबनीस यांनी बँकेचे थकबाकीदार म्हणून संचालक श्री. संजय ताम्हाणे, श्री. संतोष थोरात व श्री. संदेश पवार यांना संचालक मंडळातून निलंबीत करण्याचा ठराव सभेत मंजूर करावा व नंतरच सभेला सुरूवात करावी असा आग्रह केला. यावर सर्व उपस्थित सभासदांनी सहमती दर्शवित ठराव मंजूर करावा अशी आरडाओरडा सुरू झाली व निलंबन मंजूर करण्याचा आग्रह धरण्यात आला.

त्यानंतर सभेचे तत्कालीन अध्यक्ष श्री. अनंत भोसले व संचालक श्री. प्रकाश शिंदे यांनी सभेला शांत रहण्याची पुनश्चः विनंती केली. सभागृहातील संतप्त वातावरण व सभासदांच्या तीव्र भावनांचा आदर करीत व्यासपीठावरील संचालक श्री. प्रकाश शिंदे यांनी आम्ही तुमच्या मताशी सहमत आहोत आम्हाला तुमच्या भावना समजल्या असे म्हणून संचालक श्री. संजय ताम्हाणे, श्री. संतोष थोरात व श्री. संदेश पवार यांना संचालक मंडळातून निलंबीत करण्याचा ठराव एकमताने मंजूर करण्यात यावा असे सुचविले त्यावर सर्व उपस्थित सभासदांनी समाधान व्यक्त करून ठरावास एकमताने अनुमोदन दिले तसेच संचालक मंडळ वार्षिक सर्वसाधारण सभेतील सभासदांच्या तीव्र भावना लक्षात घेऊन मांडलेल्या ठरावाचा आदर करीत पुढील कार्यवाहीसाठी असाच ठराव मंजूर करील असे आश्वासन देतो असे सांगितले.

सभासद श्री. सी. जी. कुलकर्णी व श्री. काजवाडकर यांनी अध्यक्ष श्री. भिंगे हे बँकेला रिझर्व्ह बँकेची कारणे दाखवा नोटीस (Show Cause Notice) आली असताना बँक विना अध्यक्ष काम करू शकत नाही आणि मागील सहा महिने अध्यक्ष म्हणून कार्यान्वित नसल्यामुळे तीव्र शब्दात नाराजी व्यक्त केली तरी त्यांनाही निलंबीत करण्याची मागणी केली. यावर सर्वांनी एकमताने सहमती दर्शवून श्री. भिंगे यांचेही निलंबन करावे असे ठरले तसेच श्री. कुलकर्णी व श्री. काजवाडकर यांनी संचालक श्री. फणसे हे अध्यक्ष बनण्यास योग्य आहेत तरी त्यांचे नाव आम्ही सुचित करतो त्यावर काही सभासदांनी त्याला अनुमोदन दिले. मात्र सभासद श्री. सांगले यांनी अध्यक्ष निवडीचा अधिकार हा पूर्णतः संचालक मंडळाचा असून आपण त्याच्यामध्ये हस्तक्षेप न करता संचालक मंडळाने अध्यक्षांची निवड करावी असे सुचविले. त्यावर संचालक श्री. प्रकाश शिंदे यांनी सभेला विनंती केली की अध्यक्ष निवडण्याचा अधिकार हा संचालक मंडळाचा आहे तेव्हा या सभागृहाने सुचित केले असले तरी असे करणे उचित होणार नाही असे सुचविले. आम्ही पुढील येणाऱ्या संचालक मंडळाच्या सभेत सध्या असलेल्या अध्यक्षांविरूद्ध अविश्वास ठराव मंजूर होईल याची खात्री देतो असे स्पष्ट केले. त्यामुळे संचालक मंडळाच्या कामकाजात सभासदांनी हस्तक्षेप करू नये असे सर्वानुमते ठरले.

संचालक श्री. भाऊसाहेब चौधरी हे सभा चालू असताना निघून गेल्याबद्दल श्री. चव्हाण यांनी विचारणा केली. त्यावर संचालक श्री. फणसे यांनी श्री. चौधरी यांस दुसऱ्या सभेस जायचे असल्या कारणाने ते निघून गेले असे सांगितले. त्यावर श्री. चव्हाण यांनी वर्षातून एकदा होणाऱ्या सभेस वर्षातून एक दिवस वेळ देऊ नये हे मान्य होणारे नाही अशी नाराजी व्यक्त केली. त्यावर संचालक श्री. फणसे यांनी श्री. चव्हाण यांचे निवेदन नोंद करून घेऊ असे आश्वासित केले.

त्यानंतर कु. उषा राणे हयांनी मा. अध्यक्षांच्या सुचनेप्रमाणे सभेच्या कामकाजास सुरूवात केली.

सौ. धनश्री भुरकुटे हयांनी बँकेच्या **101** व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचनेचे वाचन केले.

तदनंतर सभेचे अध्यक्ष श्री. भोसले यांनी मनोगत सांगण्यास सुरूवात करताच सभेमध्ये मंडळाचे अध्यक्षांचे अनुपस्थितीत तात्पुरत्या अध्यक्षांचे निवेदन नको अशी चर्चा होऊन पुन्हा गदारोळ निर्माण झाला.

श्री. सांगले यांनी पुनश्चः सभेला विनंती केली की **3** थकबाकीदार संचालकांना निलंबीत करण्याचा ठराव एकमताने आमसभेत मंजूर झाला असल्यामुळे सभेचे पुढील कामकाज सुरळीत पार पाडण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे असे सुचविले. त्यानंतर सभेचे कामकाज सभेच्या नोटीसप्रमाणे सुरू करण्यात आले.

**विषय क्र. 1 ः**

दि. **13** सप्टेंबर, **2016** रोजी झालेल्या **100** व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे व ठरावावर झालेल्या कार्य वाहीची माहिती घेणे.

कु. उषा राणे यांनी विषय क्र. **1** वाचून सभेपुढे मंजूरीसाठी सादर केला. त्यावर संचालक श्री. फणसे यांनी विषय क्र. **1** बाबत कोणतेही

प्रश्न असल्यास सभेपुढे मांडण्यास सांगितले. यावर श्रीमती जान्हवी करळकर यांनी सभेचे इतिवृत्तांत नुकतेच हाती आल्यामुळे सभासदांनी कसे प्रश्न विचारावे असा सवाल उपस्थित केला.

श्री. विवेक निक्ते यांनी मात्र इतिवृत्तांत न वाचल्या कारणाने सदर ठराव मंजूर करू शकत नाही असा आक्षेप घेतला. त्यावर संचालक श्री. फणसे यांनी ठराव क्र. 1 बाबत काही सुचना असल्यास मुख्य कार्यालयात लेखी स्वरूपात देण्यात याव्यात त्याप्रमाणे काही इतिवृत्तांतातील त्रुटींबाबत योग्य त्या सुधारणा करण्याचे श्री. फणसे यांनी सरव्यवस्थापक श्री. मोरेश्वर धायमोडकर यांना सूचना केली.

श्री. यारमल यांनी मध्येच रिझर्व्ह बँकेकडून आलेल्या कारणे दाखवा नोटीस (Show Cause Notice) बाबत सभेला माहिती देण्याबाबत खुलासा मागितला.

श्री. मांगले यांनी यापुढे इतिवृत्तांत योग्य पद्धतीने मुद्देसुद रित्या लिहण्यात यावा असे सुचविले. विषय क्रमांक त्यावरील चर्चा व मंजूर झालेला ठराव अशा पद्धतीने इतिवृत्तांत लिहावा असे सुचविले आणि मागील वर्षीचा इतिवृत्तांत मंजूर करण्यात यावा असे सुचविले.

**ठराव क्र. 1 ः**

**101** व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत दि सीकेपी को-ऑप बँक लि. चा दि. **13** सप्टेंबर **2016** रोजी झालेल्या **100** व्या वार्षिक सर्व साधारण सभेचे इतिवृत्त वाचून वरिल नमूद सुचनांसह मंजूर करण्यात आला.

सूचक ः श्री. एम. जी. शिलोत्री
अनुमोदक ः श्री. सुभाष कोलापकर
ठराव सर्वानुमते मंजूर.

**विषय क्र. 2 ः**

संस्थेच्या दि. **31** मार्च **2017** रोजी संपलेल्या वर्षाचा आर्थिक अहवाल ताळेबंद व नफा तोटा पत्रकास मंजूरी देणे.

विषय क्र. 2 चे वाचन केल्यानंतर श्री. कारखानीस यांनी विषय क्र. **2** व **6** एकत्रितपणे वाचावेत असे सर्व सभेस सांगितले.

**ठराव क्र. 2 ः**

**101** व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत दि सीकेपी को-ऑप बँक लि. चा दि. **31** मार्च **2017** रोजी संपलेल्या वर्षाचा आर्थिक अहवाल व दि. **31** मार्च **2017** चे ताळेबंद व नफातोटा पत्रकास मंजूरी देण्याचे ठरविण्यात आले.

सूचक ः श्री. एन. के. गिरप
अनुमोदक ः श्री. ना. ग. दिवेकर
ठराव सर्वानुमते मंजूर.

**विषय क्र. 3 ः**

संस्थेच्या सन **2017-2018** च्या अंदाजपत्रकास मान्यता देणे.

विषय क्र. 3 बाबत श्री. कारखानीस यांनी विचारणा केली. त्यावर श्री. फणसे यांनी बँकेच्या वेबसाईटवर सदर सुचनांची कार्यवाहीची माहिती देण्यात येईल असे आश्वासित केले.

श्रीमती करळकर यांनी श्री. विजय वैद्य संदर्भात मेरू कॅपीटल कंपनीने दिलेल्या रू. **12.00** करोडच्या धनादेशाविषयी विचारणा केली. त्यावर श्री. फणसे यांनी मेरू कॅपीटल या कंपनीबरोबर त्रिपक्षी करार (Tripartite Agreement) झाला होता परंतू श्री. विजय वैद्य यांनी आवश्यक ती कागदपत्रे न दिल्यामुळे कराराच्या अटी पूर्ण न झाल्याने सदर करार आपोआप रद्द झाला व त्यामुळे धनादेश भरले गेले नाहीत. तसेच बँकेचा मेरू कॅपीटल कंपनीबरोबर बँकेच्या वसुलीसाठी जबाबदार धरण्यासाठीचा थेट करार न झाल्या कारणाने त्यांच्यावर कलम **138** अंतर्गत दावा दाखल करू शकत नसल्याचे वकिलांनी स्पष्टीकरण दिले आहे. यावर श्री. कारखानीस यांनी श्री. विजय वैद्य यांच्याकडे पुरेसे कागदपत्रे नसताना बँकेने त्यांना कर्जवाटप कसे केले असा प्रश्न विचारला. तसेच **12** मोठया थकबाकीदारांच्या (Wilful Defaulters) जामीनदारांवर अजुनही कारवाई का करण्यात आली नाही असे देखील विचारले.

त्यावर श्री. फणसे यांनी स्पष्टीकरण केले की त्यांनी स्वतः **12** थकबाकीदारांची रू. **160.00** कोटी कर्ज शिल्लक असून त्याबाबत सर्व संचालकांना बँकेने कारवाई करावी अशी विनंती केली होती त्यासंबंधीची आधीच माहिती देण्यात आली होती व **15** दिवसांत संचालक

मंडळानी कारवाई न केल्यास मी स्वतः आर्थिक गुन्हे अन्वेषण विभागात तक्रार दाखल करीन असे म्हटले होते व त्याप्रमाणे केसेस दाखल केल्या आहेत असे स्पष्टीकरण दिले. तसेच सदर कर्जवाटप केलेल्या थकवाकीदाराकडे मालमत्ता नसल्यास थकवाकीदाराला कर्जवाटप करणाऱ्या संचालक/कर्मचारी यांची मालमत्ता जप्त करून विक्री करावी व रक्कम वँकेत भरणा करावी अशी सुचना दिली होती असेही सांगितले.

श्री. उदय देशपांडे यांनी श्री. फणसे यांना 12 थकवाकीदारांना Willful Defaulter घोषित करण्यासंदर्भात विचारणा केली. त्यावर श्री. फणसे यांनी Willful Defaulter घोषित करण्यापूर्वी सदर कर्जखाती सिवील (CIBIL) संस्थेमध्ये रजिस्टर करावी लागतात व त्यासाठी कोअर वँकींग प्रणाली गरजेची असते. परंतू आजपर्यंत वँकेकडे सदर प्रणाली नसल्याने हे काम होऊ शकत नाही असा खेद व्यक्त केला. त्यावर श्रीमती करळकर यांनी श्री. फणसे यांच्या ठेवी व भागभांडवल किती आहेत अशी विचारणा केली. त्यावर श्री. फणसे यांनी रू. 300.00 रक्कमेच्या ठेवी व रू. 12000.00 रक्कमेचे भागभांडवल असल्याचे सांगितले.

यानंतर वसुलीची प्रगती निराशाजनक आहे, विशेष प्रयत्न दिसत नाहीत, वसुलीची आजची स्थिती काय असे सभेत विचारले असता कर्म चारी प्रतिनिधी श्री. सोमनाथ माने यांनी गेल्या वर्षात रू. 500.00 कोटी वसुली कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने झाली आहे असे सांगितले त्यावर सभेत प्रचंड गदारोळ निर्माण झाला. पाच वर्षाची वसुली नको मागील वर्षी काय एकूण वसुली झाली त्यामध्ये थकीत खात्याची किती वसुली झाली ती प्रथम सांगा व वँकेने काय कारवाया केल्या हे सांगा कारण यावर काहीच ठोस काम झालेले दिसत नाही वसुलीचा वेग खूपच मंदावलेला दिसतोय असा सभेचा एकूण सुर होता. शेवटी श्री. फणसे यांनी सभेला गोंधळ करू नका कृपया शांत राहण्याची विनंती केली व पुढील सहा महिन्यात वँकेची प्रगती करून रिझर्व्ह वँकेला दाखवू असे आश्वासन दिले.

श्री. सवनीस यांनी पुन्हा 3 महिन्यात ठेवीदार व सभासदांची सभा घेऊन वँकेच्या प्रगतीवद्दल सांगावे असे सुचविले. त्यावर श्री. फणसे यांनी यापुढे आपल्या सुचनेप्रमाणे सभा घ्यावी लागेल असे सांगितले.

श्री. भडसावळे यांनी सभेस प्रश्नसंचिका दिली व त्याची उत्तरे विलेपार्ले शाखेत पोच करण्यात यावी असे सांगितले.

यापुढे संचालक श्री. राजेंद्र फणसे यांनी सभासदांकडून आलेल्या सुचनांची पूर्तता व अंमलवजावणी करण्यात येऊन वँकेच्या वेवसाईटवर त्याची प्रगती प्रदर्शित करण्यात येईल असे सांगितले आणि त्यानंतर पुढील ठराव मंजूर करण्यात आला.

**ठराव क्र. 3 ः**

101 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत दि सीकेपी को-ऑप. वँक लि. च्या सन 2017-18 च्या अंदाज पत्रकास मंजूरी देण्याचे ठरविण्यात आले.

सूचक ः श्री. मोहन मांगले
अनुमोदक ः श्री. वी. एस. शानभाग
ठराव सर्वानुमते मंजूर.

**विषय क्र. 4 ः**

संस्थेच्या आर्थिक वर्ष 2017-2018 साठी अंतर्गत हिशेव तपासणीसाची नेमणूक करणे व त्याचा मेहनताना ठरविण्याचे अधिकार संचालक मंडळास देणे.

**ठराव क्र. 4ः**

101 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत दि सीकेपी को-ऑप. वँक लि. च्या आर्थिक वर्ष 2017-18 साठी अंतर्गत हिशेव तपासणीस नियुक्ती करण्याचे व त्यांचा मेहेनताना ठरविण्याचे अधिकार संचालक मंडळाला देण्याचे ठरविण्यात आले.

सूचक ः श्री. के. एस. पिसाळ
अनुमोदक ः श्री. वी. आर. कुलकर्णी
ठराव सर्वानुमते मंजूर.

**विषय क्र. 5 ः**

संस्थेच्या आर्थिक वर्ष 2017-2018 साठी वैधानिक लेखापरिक्षक म्हणून संचालक मंडळाने शिफारस केलेल्या लेखापरिक्षकाची नियुक्ती करणे व त्याचा मेहनताना ठरविण्याचे अधिकार संचालक मंडळास देणे.

मध्या कार्यरत असलेले लेखा परिक्षक या विषयावर चर्चा करीत असताना परिक्षकांचे कामकाज समाधानकारक दिसत नसल्याची तक्रार करून नवीन लेखा परिक्षकांची नेमणूक करण्यात यावी असे सर्व सभासदांनी सुचविले त्यावर संचालक मंडळ यावर सर्वतोपरी विचार करील असे सांगण्यात आले.

त्यावर संचालक मंडळाकडून श्री. कारखानीस यांनी वैधानिक लेखापरिक्षक म्हणून कोणाची शिफारस करण्यात आली आहे अशी विचारणा केली व त्यांचे नाव सभेच्या नोटीसमध्ये लिहीण्याची सुचना केली. यावर सभासद श्री. काजवाडकर यांनी श्री. कारखानीस यांची लेखा परिक्षक म्हणून नियुक्ती करावी असे सुचविले. श्री. कारखानीस यांनी लेखा परिक्षक म्हणून काम करण्यास नकार दिला. त्यानंतर यावावत संचालक मंडळ योग्य तो निर्णय घेईल असे ठरले व पुढील ठराव मंजूर करण्यात आला.

**ठराव क्र. 5 :**

101 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत दि सीकेपी को-ऑप वँक लि. च्या आर्थिक वर्ष 2017-18 साठी वैधानिक लेखा परिक्षक नियुक्ती करण्याचे व त्यांचा मेहेनताना ठरविण्याचे अधिकार संचालक मंडळाला देण्याचे ठरविण्यात आले.

सूचक : श्री. मोहन मांगले
अनुमोदक : श्री. नारायण के. शिंदे
ठराव सर्वानुमते मंजूर.

**विषय क्र. 6 :**

सन 2016-2017 च्या वैधानिक लेखापरिक्षकाच्या अहवालाची नोंद घेणे.

सदर विषय विषय क्र. 2 सोवत एकत्रितपणे मंजूर झाल्याचे सभासदांनी सांगितले.

**ठराव क्र. 6:**

101 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत दि सीकेपी को-ऑप वँक लि. च्या सन 2016-17 च्या वैधानिक लेखापरिक्षकांच्या अहवालाची नोंद घेण्यात आली.

सूचक : श्री. एन. के. गिरप
अनुमोदक : श्री. ना. ग. दिवेकर
ठराव सर्वानुमते मंजूर.

**विषय क्र. 7 :**

97 व्या घटना दुरूस्तीच्या अनुषंगाने उपविधीमध्ये झालेल्या वदलास मंजुरी देणे.

**ठराव क्र. 7:**

101 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत दि सीकेपी को-ऑप. वँक लि. च्या 97 व्या घटना दुरूस्तीच्या अनुषंगाने झालेल्या वदलास मंजूरी देण्याचे ठरविण्यात आले.

अ. वँकेचे अधिकृत भाग भांडवल रू. 60.00 कोटींवरून रू. 300.00 कोटी इतके वाढविण्यावद्दल मंजूरी देणे.

**ठराव क्र. 7 अ :**

वँकेचे अधिकृत भाग भांडवल रू. 60.00 कोटींवरून रू. 300.00 कोटी इतके वाढविण्यावद्दल मंजूरी देण्याचे ठरविण्यात आले.

सूचक : श्री. सी. जी. कुलकर्णी
अनुमोदक : श्री. व्ही. जी. पाठक
ठराव सर्वानुमते मंजूर.

ब . उपविधीस मंजूरी देणे .

**ठराव क्र . 7 ब ः**

उपविधीस मंजूरी देण्यात आली .

सूचक ः श्री . काजवाडकर
अनुमोदक ः श्री . दिलीप गुप्ते
ठराव सर्वानुमते मंजूर .

**विषय क्र . 8 ः** मा . अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळी येणारे विषय

**1 .** श्री . फणसे यांनी रिझर्व्ह बँकेची कारणे दाखवा नोटीस आली असताना बँक गंभीर परिस्थितीतून मार्ग काढत असताना अध्यक्ष श्री . भिंगे यांच्या सतत होत असलेल्या अनुपस्थितीबद्दल व कामकाजात सहभागी होत नसल्याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली . श्री . फणसे यांनी यापुढे असे सांगितले की मंत्रालयात झालेल्या सभेमध्ये ज्याचे इतिवृत्तांतही उपलब्ध नाही अशा स्थितीत मे . मिलिंद डेव्हलपर्स कर्जदाराविरूद्ध केलेली Criminal Complaint श्री . भिंगे यांनी कोणत्या आधारे व कशी मागे घेतली ज्याची संचालक मंडळाला कल्पना दिली नाही ही चिंताजनक बाब आहे हे मी सभेच्या निर्दशनास आणतो आहे असे अधिक स्पष्टपणे मांडले .

यानंतर रिझर्व्ह बँकेच्या नियमानुसार **2** तज्ञ संचालकांपैकी एक श्री . राम मुंजे ज्यांनी काही बँकांच्या सरव्यवस्थापक पदावर काम करीत बँकींगचा प्रदीर्घ अनुभव, शिवाय अडचणीच्या बँकांना त्यांनी मार्गदर्शन करून त्या आज चांगल्या स्थितीत काम करीत आहे त्यांची बँकेचे तज्ञ संचालक पदी नेमणूक केल्याचे श्री . फणसे यांनी सांगितले .

तसेच विचारणा झाली असता या पुढील संचालक मंडळाच्या सभेत निवडून आलेले संचालक कोणत्याही प्रकारचे भत्ते कोणतेही संचालक घेणार नाहीत असे सांगितले व त्यास सर्वांनी संमती दर्शविली .

**2 .** श्री . शिंदे यांनी आपले मनोगत व्यक्त करत असताना स्पष्टीकरण दिले की कर्जदार श्री . मिलिंद निरखारगे यांनी माझ्याजवळ बंद पाकीट दिले जे मी बँकेत जसेच्या तसे पाठविले होते तसेच सभासद श्री . धुमाळे यांनी श्री . शिंदे यांनी श्री . मिलिंद निरखारगे यांना जामीन दिल्याचे आरोप केले हे साफ खोटे असल्याचे सांगितले . यावर श्री . फणसे यांनी श्री . शिंदे यांचे रू . **70 . 00** लाखांचे भागभांडवल असून ते बँकेच्या हितासाठी नेहमी प्रयत्नशील असल्याचे स्पष्ट केले .

**3 .** त्यानंतर श्री . फणसे यांनी नवनिर्वाचित तज्ञ संचालक श्री . राम मुंजे यांची सभेस थोडक्यात ओळख करून दिली व श्री . मुंजे यांस सभेस मार्गदर्शन करावे अशी विनंती केली .

श्री . राम मुंजे यांनी मार्ग काढण्यासाठी सद्यपरिस्थितीतून बँकेस केवळ **60** दिवसांची मुदत असल्याचे स्पष्ट केले . या **60** दिवसांत सर्व सभासदांचे पाठबळ घेऊन **100** वर्ष पूर्ण केलेल्या बँकेस सर्वजण मिळून बाहेर पडण्यास प्रयत्नशील असावे असे आवाहन केले व यासाठी पुढील **60** दिवसात Revival Action Plan तयार करताना खालील बाबींस प्राधान्यक्रम देण्यात येण्याचे श्री . मुंजे यांनी स्पष्ट केले .

1 . वसुलीसाठी त्वरीत कायदेशीर कारवाई करणे .

2 . नवीन भागभांडवल उभारणीसाठी प्रयत्न करणे .

3 . कर्मचाऱ्यांस प्रोत्साहन देऊन वसुलीसाठी सर्वांनी निकराचे एकजुटीने प्रयत्न करणे .

4 . बँकेच्या जागांची विक्री करण्याचा पर्याय शोधणे .

**4 .** रिझर्व्ह बँकेकडे संचालक मंडळाने नव्याने विश्वास संपादन करण्याची गरज आहे . त्यासाठी आवश्यक ती कृती योजना राबविणे व त्यासाठी सर्वप्रथम दिर्घकाळ अनुपस्थित असणाऱ्या व कार्यरत नसणाऱ्या आणि वेगवेगळे गंभीर आरोप होत असणाऱ्या संचालकांनी शक्यतो स्वतःहून राजीनामा देणे अधिक योग्य आहे असे सांगितले असे झाल्यास रिझर्व्ह बँकेला Revival Action Plan राबविण्याची प्रामाणिकता आहे हे दिसून येईल .

वरिल सर्व होणाऱ्या प्रयत्नांमध्ये सभासदांनी व ठेवीदारांनी जास्तीत जास्त सहभागी व्हावे असे आवाहन श्री . मुंजे यांनी सभेस केले .

**5 .** श्री . देशपांडे यांनी पुढील **15** दिवसांत Action Plan सर्व सभासदांना कळवावा असे सुचविले . यावर श्री . राम मुंजे यांनी सांगितले

की यापुढे याबाबत होत असलेल्या प्रगतीबद्दल सर्व सभासदांना वेळोवेळी कळविले जाईल व पुढील **30** दिवसांत बँकेचा Revival Plan & Turnaround strategies चा कृती आराखडा रिझर्व्ह बँकेकडे सादर केला जाईल असे स्पष्ट केले.

6. **यावर बँकेचा Revival Plan** श्री. मुंजे यांना माहित आहे का व बँक लिक्वीडेट झाल्यावर काय होणार अशी विचारणा श्री. विवेक निक्ते यांनी केली.

   श्री. निक्ते यांच्या प्रश्नाचे उत्तर देताना श्री. मुंजे यांनी असे सांगितले की बँकेच्या Revival Plan ची माहिती घेतली जाईल व त्यात काही त्रुटी बघून आवश्यक ती सुधारणा केली जाईल तसेच श्री. राम मुंजे यांनी अधिक स्पष्ट केले की मी आपणहून लिक्वीडेशन, विलीनीकरण व अधिग्रहण हे शब्द उच्चारणार नाही कारण बँक वाचविणे हेच माझ्यासाठी प्रथम महत्त्वाचे आहे व त्यासाठी एकजुटीने आपण सर्वजण यापुढे प्रयत्न करणार आहेत असे आश्वासक सुचविले व सर्वजण आपण करू या "Yes We Can" असे सभेपुढे होकारार्थी मांडणी केली.

7. श्री. भागीरथ शानभाग यांनी कर्मचाऱ्यांना प्रोत्साहानात्मक प्रशिक्षण देण्याची तयारी दर्शविली.

त्यानंतर कुठलाही विषय नसल्यामुळे सभेचे अध्यक्ष श्री. अनंत भोसले यांनी उपस्थितांचे आभार मानले. त्यानंतर राष्ट्रगीत झाल्यानंतर अध्यक्षांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

| | |
|---|---|
| दि सीकेपी कोऑपरेटिव्ह बँक लि. | दि सीकेपी कोऑपरेटिव्ह बँक लि. |
| **अध्यक्ष** | **संचालक** |